
सर कंफरन्स

आणि

पहिले वर्तुळाकार मेज

लेखिका: सिंडाय न्यूशवंडर

चित्रे: वेन गीहन



महाराज आर्थरपुढील समस्या!

महाराजांचे सरदार एकत्र येतात, तेव्हा एका लांबलचक मेजाभोवती बसतात. मेजाच्या शेवटच्या टोकावरील सरदाराला आपला आवाज ऐकू गेला पाहिजे, म्हणून महाराजांना मोठ्या आवाजात ओरडून बोलावे लागते. ही समस्या सोडवण्यासाठी सर कंफरन्स आणि ॲमिटरची महोदया डाय याहून चांगले मेज (टेबल) बनवू शकतात का?

या गमतीदार गोष्टीतून तुम्हाला राजवाड्याचा दौरा घडेल, खेळांचे सामने पाहायला मिळतील आणि सर कंफरन्ससोबत प्रवास करता येईल. ते भविष्याला व्यापून राहील अशा विलक्षण आकाराचा शोध घेत आहेत. गोंगाट करणारे सरदार, एक चतुर सुतार आणि कसरती दाखवणारा जादूगार हे सगळेच तुमच्या गमतीजमतीत भर टाकतील.



सर कंफरन्स

आणि

पहिले वर्तुळाकार मेज

मराठी अनुवाद: **सुशील चव्हाण**


फार फार वर्षांपूर्वी, *केमलॉट* नावाच्या देशात, अनेक सरदार आणि कुलीन स्त्रिया राहात असत. त्यांचा राजा एक पराक्रमी, परंतु दयाळू माणूस होता. त्याचे नाव होते, *आर्थर.* त्याच्या कारकिर्दीत राज्यात शांतता आणि धनधान्यांनी युक्त समृद्धी नांदत होती. त्याची प्रजा सुखात राहात होती.

एकदा त्यांनी राज्याच्या उत्तर सीमेवर शेजारी राज्याचे सैन्य एकत्र होताना पाहिले. त्या सैन्याला *घेराव घालणारे* असे ओळखले जात असे. ते युद्धाची तयारी करत होते, असे वाटत होते. महाराज आर्थर यांनी या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी आपल्या सर्वात शूर सरदारांना बोलावून घेतले.









सारे सरदार घोड्यांवर स्वार होऊन वेगाने महाराजांच्या राजवाड्यात पोहोचले. *सर कंफरन्स* हे प्रमुख सरदार नजिकच राहात होते. ते त्यांच्या कुटुंबियांसमवेत आले. सर कंफरन्स यांचे लग्न *ॲमिटर* शहरात राहाणाऱ्या *डाय* या कुलीन स्त्रीशी झाले होते.

त्यांच्या मुलाचे नाव होते, *रेडियस.* तो दिसायला खूप लहान होता. पण त्याची तीक्ष्ण बुद्धी आणि अमर्याद उर्जा त्याच्या उंचीची आणि वयाची उणीव भरून काढत होत्या.

पहिल्या दिवशीच्या चर्चेत महाराज आपल्या सर्व सरदारांसोबत बसले. महोदया डाय या सर कंफरन्स यांच्या शेजारी बसल्या.

“ओह,” महाराज कण्हले, “माझ्या घश्यात दुखायला लागलंय. मेजाच्या त्या टोकापर्यंत आवाज पोहोचण्यासाठी मला मोठ्याने बोलावं लागतं. सगळ्यांनाच मोठ्याने बोलावं लागतं. त्यामुळे मला अस्वस्थ वाटतं.”

“तुम्ही मेज ठीक का करून घेत नाही?” महोदया डाय यांनी सुचवले.






“ते कसं करता येईल?” सर कंफरन्सने विचारले.

“बघा,” महोदया डाय म्हणाल्या, “आपण मेज अर्धा कापून घेऊ. हे मेजाचं चित्र बघा. त्याच्या दोन बाजू जास्त लांबीच्या आहेत आणि दोन बाजू आखूड लांबीच्या आहेत. आपण मेज अर्ध कापलं तर दोन सारखे भाग बनतील. त्यांच्या जास्त लांबीच्या बाजू एकमेकांना चिकटून ठेवल्या तर मेजाच्या सर्व बाजू सारख्या लांबीच्या होतील.”





“महोदया, ही चांगली कल्पना आहे!” सर कंफरन्स यांनी *जॉ ऑफ मेट्रीच्या* सुताराला बोलावून घेतले व ताबडतोब कामाला सुरुवात केली.

पुढल्या दिवशी, नवे मेज तयार झाले. सगळ्यांनी त्या अद्भूत, चौरसाकृती मेजाबद्दल आपली मते नोंदवली. पण मग आणखी एक समस्या उद्भवली.

जेव्हा कुणी भाषण करत असे, तेव्हा मेजाच्या प्रत्येक कोपऱ्यात बसलेले सरदार एकमेकांमध्ये कुजबूज करू लागत.


सर *गॅलाहड* उद्गारले, "महाराज आर्थर, आपले हे सरदार अशी कुजबूज करत असताना चर्चा कशी करायची?"




"सर गॅलाहड बरोबर बोलतायत," महाराज आर्थर उत्तरले. "आपण इथे शत्रुंपासून आपल्या देशाचे रक्षण करण्याबाबत चर्चा करायला जमलोय, कुजबूज करायला नाही."

चर्चेनंतर, महाराज आर्थर यांनी सर कंफरन्स यांना म्हटले की चर्चेसाठी नवा मेज आणला पाहिजे. त्या रात्री, सर कंफरन्स यांनी महोदया डाय यांना चौरसाकृती मेजाबाबत आलेल्या समस्येची माहिती दिली.

क्षणभर विचार करून महोदया डाय म्हणाल्या, "आपण चौरसाकृती मेज त्याच्या कर्णरेषेवर कापले तर. मग बनलेले दोन भाग एकत्र करून बर्फीच्या आकाराचे मेज तयार होईल."




महोदया डाय यांनी एक चित्र बनवले आणि म्हटले, "महाराज एका कोपऱ्यात बसतील आणि तुम्ही विरुद्ध कोपऱ्यात. मग प्रत्येकजण जवळजवळ असतील. आपले सरदार कुजबूज करू शकणार नाहीत."



चित्र पाहून सर कंफरन्स यांनी त्यातील कल्पनेस आपली पसंती दर्शवली. सुतार जियो म्हणाला, "सुतार लोक या आकाराला *समांतरभुज चौकोन* म्हणतात. मी उद्यापर्यंत मेज तयार ठेवतो."

पुढल्या दिवशी, सर *लँसलॉट* आणि सर *गवैन* हे समांतरभुज चौकोनी आकाराचे मेज बघून चकीत झाले. इतर लोकांनाही ते पसंत पडले, पण राजा आर्थरला मेजाच्या एका टोकाला कोपऱ्यावर बसण्याची कल्पना काही रुचली नाही.



सर कंफरन्स यांच्याशी बोलताना महाराजांनी सरदारांना तलवारबाजीचा सराव करण्यास परवानगी दिली.

"सर कंफरन्स, मेजाचा हा कोपरा मला तलवारीसारखा खुपतोय. आपल्याला युद्ध टाळण्यासाठी काय करावं, याचा विचार करणं गरजेचं आहे. पण हे मेज तर मला लढण्यासाठी चिथवतंय. याला ठीक करता येईल?"

"मी त्याला ठीक करायचे पुरेपूर प्रयत्न करतो," सर कंफरन्स म्हणाले.



त्या दिवशी दुपारी, सर कंफरन्स यांनी मैदानाजवळ उभे राहून सरदारांना सराव करताना पाहिले. तो एक सुंदर दिवस होता. आभाळ निरभ्र होते. झेंडे वाऱ्यावर फडकत होते. सर गवैन यांचा झेंडा निळा होता त्यावर सिंहाचे चित्र होते. सर *टोरे* यांचा झेंडा हिरवा होता आणि त्यावर गरुडाचे चित्र होते. सर्व झेंडे सारख्याच त्रिकोणी आकाराचे होते.

“छान,” सर कंफरन्स म्हणाले, “आपण त्रिकोणी आकाराचा मेज बनवू!”




सर कंफरन्स यांनी त्वरित जियोला बोलावून घेतले आणि त्याला मेजाच्या नव्या आकाराबद्दल समजावले. जियो म्हणाला, “आपण समांतरभुज चौकोनी आकाराच्या मेजाला त्याच्या एका कर्णरेषेवर कापलं, तर आपल्याला दोन त्रिकोण मिळतील. पण त्यातला एक त्रिकोण कदाचित खूप छोटा असेल.”

मग त्यांनी नियोजीत त्रिकोणी मेज कापला, तेव्हा त्यांना जाणवले की मेजाच्या प्रत्येक बाजुवर चार लोक बसू शकणार नाहीत. “काही वेगळा विचार करू, जियो,” सर कंफरन्स म्हणाले आणि ते मेजाच्या आकाराची चर्चा करण्यास महोदया डायकडे गेले.




“बरोबर आहे,”महोदया डाय म्हणाल्या. “त्रिकोण खूप लहान होतील. कोपरे हे असे कापा, म्हणजे अष्टकोन बनेल. बघा, सुटला प्रश्न.”





सरदार अष्टकोनी मेजाभोवती बसले. प्रत्येकाला मेजाची एक पूर्ण बाजू हवीशी वाटत होती. पण मेजाला फक्त आठच बाजू होत्या आणि सरदार होते बारा. कोण आपली बाजू दुसऱ्याशी वाटून घेईल?

महाराजांकडे स्वत:ची एक पूर्ण बाजू असायला हवी, यावर त्यांचे दुमत नव्हते. कारण ते त्यांचे नेता होते. पण मग सात बाजू आणि त्यांच्यासाठी अकरा सरदार शिल्लक राहात होते.




“सरदारांनो, काही निश्चित व्यवस्था हवी,” महाराज आर्थर शांतपणे म्हणाले.

“आपण इथे आपल्या देशाच्या रक्षणाची योजना बनवण्यासाठी गोळा झालोय, हे विसरू नका. या मेजामध्ये बाजू आणि कोनांची समस्या आहे. त्याच्यावर बसून आपण चर्चा कशी करायची? सर कंफरन्स, सुताराला अंड्याच्या आकाराचा मेज बनवायला सांगा. कदाचित त्यानंतर आपण एका समूहासारखे बसू शकतो.”

सर कंफरन्स यांनी जियोला अंडाकृती मेज बनवण्याचा आदेश दिला.

जियो म्हणाला, “असा मेज बनवणं अवघड आहे, कारण त्याला सरळ बाजुच नाहीत. मी लगेच बनवायला घेतो.”



सरदार पुन्हा गोळा झाले. अंडाकृती मेज पाहून ते प्रभावित झाले. सर लँसलॉट यांनी या प्रसंगानिमित्त पेले उचलून मद्याचा आस्वाद घेण्यास सुचवले.

सर्व सरदारांनी आपले पेले उचलले, पण मेजाच्या टोकांना मोठा गोंधळ झाला.



अंडाकृती मेजाच्या टोकांना असलेल्या सरदारांनी आपले पेले उचलले तेव्हा ते महाराजांना धडकले. तिथे कुणाकडेही पुरेशी जागा नव्हती.


काही सरदार आपसांत वाद घालू लागले. मग महाराज आर्थर ओरडले, “थांबा! सर कंफरन्स यांना सोडून सगळे निघून जा. आपण उद्या भेटू.”


महाराज आर्थरशी चर्चा करून सर कंफरन्स निराश अवस्थेत घरी परतले.

रेडियस म्हणाला, “बाबा, माझ्यासमोर एखादी समस्या उभी राहिली, ती सोडवणं मला कठीण जाऊ लागलं तर मी थोडा वेळ वेगळ्याच गोष्टीत मन गुंतवतो. आपण थोडा वेळ फिरायला जाऊया का?”

मग त्या दिवशी दुपारी, सर कंफरन्स, रेडियस आणि महोदया डाय घोडेस्वारी करायला गेले. थोड्या वेळाने रेडियस ओरडू लागला, “बाबा, बघा! एक झाड पडलंय!”

“खरंच की,” कंफरन्स म्हणाले.







“बघा बाबा, तुमचं मेज!”

झाड जवळून बघण्यासाठी महोदया डाय तिच्या घोड्यावरून उतरली. बुंध्याजवळ जाऊन, आपल्या टाचांवर उभे राहून तिने आपले हात वर ताणले. तिची बोटे झाडाच्या बुंध्याच्या वरच्या कडेला जेमतेम पोहोचली.

“हे झाड खूप मोठं आहे,” ती म्हणाली. “याचा बुंधा तर माझ्या उंचीपेक्षा जास्त उंच आहे. याचं लाकूड उत्तम दर्जाचं दिसतंय.”

मग सर कंफरन्स यांनी मेज बनवण्यासाठी जियोला झाडाच्या बुंध्याचा एक काप घ्यायला सांगितले.



“बाहेची साल काढू नका, ती तशीच राहू दे,” त्याने जियोला म्हटले, “मला सालीचा खडबडीतपणा बरा वाटतो.”

त्याच्या मदतनीसांनी झाडाचा महाकाय बुंधा बघितला. मग त्यांनी तो वजनदार बुंधा एका बैलगाडीत लादला आणि जियोच्या कार्यशाळेत नेला. जियोने रात्रभर काम करून नवा मेज बनवला.

पुढल्या दिवशी सरदार गोळा झाले तेव्हा मेज तयार झाले होते. सगळेजण समाधानी दिसले. आता कुणी ओरडले वा कुजबुजले नाही. आपल्याला कोपऱ्यात टाकले वा जाळ्यात अडकवले असे कुणाला जाणवले नाही. कुणाच्या पोटात दुखले नाही आणि कुणाला गुदमरल्यागत वाटले नाही.

मेजाभोवती सगळेजण समान स्थानांवर होते. त्यांनी बरीच चर्चा केली आणि शेवटी निर्णय घेतला की शेजारी देशांशी शांतता राखण्याचा प्रयत्न करणे, हाच समस्येवरील सर्वात चांगला उपाय आहे. महाराज आर्थर यांना या निर्णयाने आनंद झाला. त्यांनी त्या रात्री हा आनंद साजरा करायचे, असे जाहीर केले.





मग सर्वजण संगीत, नृत्य आणि मेजवानीचा आस्वाद घेऊ लागले. अचानक संगीत बंद झाले. एक दूत धावत आला. त्याने महाराज आर्थर यांना एक सील केलेला लखोटा दिला. तो वाचून महाराजांनी स्मित केले.

“सभ्य स्त्रियांनो, सरदारांनो आणि पाहुण्यांनो, माझ्याकडे एक उत्तम बातमी आहे. आपले शेजारी आपल्यावर हल्ला करण्याची योजना बनवत नाहीयत. ते फक्त त्यांच्या राज्याच्या क्षेत्राचे मोजमाप करतायत. याने आपल्या देशातील शांतता भंगणार नाही!”



“हुर्रे!” सर्वांनी जयघोष केला. मग राजाने हात उंचावून सर्वांना शांत राहाण्याची सूचना केली.

“आपले राज्य वाचवण्यासाठी जे सरदार या मेजावर जमलेयत, त्यांच्या सन्मानार्थ आजपासून ते *वर्तुळाकार मेजाचे सरदार* म्हणून ओळखले जातील.


आपण कंफरन्स, महोदया डाय आणि त्यांचा मुलगा रेडियस यांचेही आभार मानूया. कारण त्यांनीच हे वर्तुळाकार मेज प्रत्यक्षात आणलं.”

सगळे पुन्हा जयघोष करू लागले.




“शिवाय, ॲमिटरच्या महोदया डायची हात ताणलेल्या स्थितीतील उंची मेजाच्या दोन विरुद्ध टोकांमधील अंतराइतकी आहे. म्हणून या मापाला आम्ही तिचं नाव देतोय. आपण या अंतराला आजपासून *डायामीटर (व्यास)* म्हणू.”

“मला रेडियसचाही अभिमान वाटतोय,” महाराज आर्थर म्हणाले. “एक दिवस तो नक्कीच एक चांगला सरदार बनेल. तो दिसायला खूप लहान वाटतो, पण त्याच्या डोक्यात मोठमोठ्या कल्पना घोळत असतात.” सर्वांनी मान डोलावून टाळ्या वाजवल्या. “म्हणूनच, वर्तुळाच्या केंद्रापासून कडेपर्यंत असलेल्या अंतराला आजपासून आपण *रेडियस (त्रिज्या)* म्हणू.”



आणि शेवटी, आपण बुद्धिमान कंफरन्सला कसं विसरू शकतो? आपल्या मेजाच्या कडेवरची साल तशीच ठेवायची कल्पना त्याचीच होती. म्हणून आजपासून कोणत्याही वर्तुळाच्या कडेला आपण त्यांच्या नावाने ओळखूया. वर्तुळाच्या कडेला आपण *सरकंफरन्स (परिघ)* म्हणू.”





सर कंफरन्स यांनी राजाला झुकून नमस्कार केला. सर्व लोक त्याच्या सन्मानार्थ उभे राहिले, जयजयकार करू लागले आणि पाय जमिनीवर आपटू लागले. हा राज्यातील तोपर्यंत झालेला सर्वात अविस्मरणीय असा आनंदी सोहळा होता.



समाप्त